# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला
## कृषि नगर, अकोला - ४४४ १०४

**संदर्भ -** विद्यापीठ जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१४ दि. १७ जुलै, २०१४

## सु च ना

**क्र.बीडीए/जाहिरात/भप्र/क.सं.स./१५** **दिनांक ७ एप्रिल, २०१५**

संदर्भीय जाहिरातीचे अनुषंगाने, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील कनिष्ठ संशोधन सहायक या पदाकरीता मुलाखतीस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधीत उमेदवारांनी खालील नमुद प्रमाणे मुलाखतीस उपस्थित होणे आवश्यक आहे.

| अक्र | दिनांक व वेळ | | यादीतील अ.क्र. | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | २०.०४.१५ | सकाळी ९.०० वाजता | ०१ ते ६० | विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ. वि., अकोला |
| २ | २१.०४.१५ | सकाळी ९.०० वाजता | ६१ ते १२० | |
| ३ | २२.०४.१५ | सकाळी ९.०० वाजता | १२१ ते १८० | |
| ४ | २३.०४.१५ | सकाळी ९.०० वाजता | १८१ ते २४० | |
| ५ | २४.०४.१५ | सकाळी ९.०० वाजता | २४१ ते २९४ | |

उपरोक्त मुलाखतीस उपस्थित होण्याकरीता मुलाखत पत्र विद्यापीठाचे संकेतस्थळावर १० एप्रिल, २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी प्राप्त झालेला लॉगइन क्रमांक वापरुन मुलाखत पत्राची प्रत उपलब्ध करून घ्यावी. तसेच वरील यादीमध्ये नमुदपैकी उमेदवारास मुलाखत पत्र उपलब्ध न झाल्यास त्यांनी स्वत:चे नाव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटो ओळखपत्र सोबत आणून प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, डॉ. पं. दे.कृ.वि., अकोला यांचे कार्यालयातून दिनांक १८.०४.२०१५ रोजी कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावे. मुलाखत पत्राशिवाय मुलाखतीस परवानगी दिली जाणार नाही.

सदर भरती प्रक्रीया अत्यंत पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे प्रक्रीयेदरम्यान वा नंतर कोणीही नोकरी लावून देण्याचे आमीष दाखविल्यास किंवा त्यासाठी पैशांची मागणी केल्यास संबंधीत उमेदवारांनी अशा व्यक्तीचा/ व्यकीची थेट नजीकच्या पोलीस स्टेशनला तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आवश्यक पुराव्यासह तक्रार दाखल करावी व त्याबाबतची माहिती कुलसचिव, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचेकडे सादर करावी. कृपया संबंधीतांनी नमुद बाबींची नोंद घ्यावी.

उमेदवारांनी बोलाविण्यात आलेल्या रोजी मुलाखत पत्र, आवश्यक कागदपत्र व फोटो ओळखप्रमाणपत्रासह मुलाखतीसाठी वेळेवर हजर रहावे.

कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

Mcert